आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ जून २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सभापतीपदी ओम बिर्ला यांची सलग दुसऱ्यांदा निवड
- महाराष्ट्र विधिमंडळाचं उद्यापासून पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरु होणार, मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकत विरोधी पक्षांचा आक्रमक पवित्रा
- विधान परिषदेच्या ४ जागांसाठी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ६४ टक्के मतदान
- युक्रेनला अमेरिकेचं आर्थिक पाठबळ राहील तोपर्यंत रशिया- युक्रेन युद्ध थांबण्याची शक्यता नसल्याची रशियाच्या राजदूताची स्पष्टोक्ती
- आगामी पॅरीस ऑलिम्पिकसाठी भारताचा हॉकी संघ जाहीर, कर्णधारपद हरमनप्रित सिंगकडे

  **आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत उद्या भारताची गतविजेत्या इंग्लंडशी लढत

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ खासदार ओम बिर्ला यांची आज लोकसभेच्या सभापतीपदी सलग दुसऱ्यांदा निवड झाली. निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेता राहुल गांधी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बिर्ला यांचं अभिनंदन केलं आणि त्यांना आसनापर्यंत नेलं.

बिर्ला यांची दुसऱ्यांदा निवड होण्यानं इतिहास रचला गेल्याची प्रतिक्रिया मोदी यांनी व्यक्त केली. संसद सदस्यांची वर्तणूक आणि उत्तरदायित्व यामुळे जनतेचा संसदीय लोकशाहीवरचा विश्वास वाढतो, असं प्रधानमंत्री म्हणाले.

तत्पूर्वी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच मोदी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या इतर नेत्यांनी बिर्ला यांची सभापतीपदी निवड करण्यासाठीचा प्रस्ताव ठेवला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि समाजवादी पक्षाचे आनंद भदौरिया यांनी काँग्रेसचे सभापतीपदासाठीचे उमेदवार कोदिकुन्निल सुरेश यांना अनुमोदन देणारा प्रस्ताव मांडला. पण विरोधी पक्ष मतदानाविषयी आग्रही न राहिल्यामुळे बिर्ला यांची निवड आवाजी मतदानानं करण्यात आली. बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभापती पदासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव संमत करुन लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार आहे. विधानसभेचं निवडणुकीपूर्वीचं हे शेवटचं अधिवेशन असून ते येत्या १२ जुलैपर्यंत चालेल. येत्या शुक्रवारी २८ जुलैला राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प दोन्ही सभागृहांमधे मांडला जाईल.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारनं आज सह्याद्री अतिथीगृहात चहापान कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, तसंच इतर मंत्री  उपस्थित होते. या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. महाविकास आघाडीच्या वार्ताहर परिषदेत विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी ही माहिती दिली. पावसाळी अधिवेशनात राज्यातल्या विविध प्रश्नांवर विरोधी पक्ष आवाज उठवतील असं ते म्हणाले. शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमुक्ती द्यावी, वीजबिलं माफ करावीत, विविध परीक्षांमधल्या पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदा याच अधिवेशनात करावा, आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी जातनिहाय जनगणना

करावी, शक्तीपीठ मार्ग प्रकल्प रद्द करावा या मागण्या विरोधक लावून धरतील, असं वडेट्टीवार यांनी सांगितलं.

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आणि महाविकास आघाडीचे इतर नेते यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्याचा आगामी अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवक यांच्यासह सर्व जनतेच्या भल्याचा असेल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केला. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

राज्यातल्या सर्व मुद्द्यावर सरकार विरोधकांशी चर्चा करायला तयार आहे. पण विरोधकांना केवळ जनतेची दिशाभूल करायची आहे, त्यामुळे ते चर्चेला तयार नसल्याचं ते म्हणाले. विरोधकांनी राज्याच्या हिताचे अनेक प्रकल्प थांबवले. आमच्या सरकारने अनेक प्रकल्पांना मंजुरी दिली, ते पूर्णत्वाकडे नेले, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

या अधिवेशनात राज्यासमोरचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ४ जागांसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मुंबई पदवीधर मतदारसंघात ५२ पूर्णांक १८ शतांश टक्के, तर मुंबई शिक्षक मतदारसंघात ७३ पूर्णांक ३६ शतांश टक्के मतदान झालं होतं.

कोकण पदवीधर मतदारसंघात ५९ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर नाशिक शिक्षक मतदारसंघात ७० टक्के पेक्षा जास्त मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या एकशेपन्नासाव्या जयंती दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात येत आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं  शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांनीही शाहू महाराजाना समाजमाध्यमांवर आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

छत्रपती शाहू महाराजांच्या १५० व्या जयंती निमित्त वंचित बहुजन आघाडीनं राज्यभरात जिल्हास्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रमातून पक्षानं दिलेले ११ ठराव मांडण्याचे निर्देश पक्षानं दिले आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी आरक्षणाची प्रामाणिक आणि प्रभावीपणे १०० टक्के अंमलबजावणी करावी, असा ठराव वंचित बहुजन आघाडी आयोजित आरक्षण हक्क परिषदेत करण्यात आला. "खाजगीकरणात आरक्षणाची" तरतूद करावी यासाठी लढा उभारण्याचा ठरावही या परिषदेनं केला.

आरक्षणाचं प्रमाण लोकसंख्येतल्या टक्केवारीइतकं असावं, नोकरी आणि शिक्षणातल्या जागांची उपलब्धता वाढवावी, जातीनिहाय जनगणना करावी, आणि त्या आधारे ओबीसींचं राजकीय आरक्षण पुनर्स्थापित करावं, गेल्या एक वर्षात दिलेली "कुणबी" जात प्रमाणपत्रं रद्द करावीत, मुस्लिमांसाठी ५ टक्के शैक्षणिक आरक्षण तात्काळ लागू करावं, इत्यादी ठराव या परिषदेनं केले आहेत.

<><><><><>

अमेरिका जोपर्यंत युक्रेनला युद्धासाठी आर्थिक पाठबळ देत राहील तोपर्यंत रशिया- युक्रेन युद्ध थांबण्याची शक्यता नाही, असं आज रशियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे विशेष राजदूत रॉडिऑन मिरोशनिक यांनी सांगितलं. ते मुंबईत रशियन हाऊस इथं तज्ज्ञांशी आणि प्रसारमाध्यमांशी बोलत होते. युक्रेनला मदत

करणं अमेरिकेनं थांबवलं तरच युद्धबंदी होऊन शांतता नांदेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

आगामी पॅरीस ऑलिम्पिकसाठी १६ सदस्यांचा भारतीय हॉकी  संघ आज हॉकी इंडियानं नवी दिल्लीत जाहीर केला. या संघातले पाच हॉकीपटू पहिल्यांदाच ऑलिम्पिक खेळणार असून तिसऱ्यांदा ऑलिम्पिक खेळणारा अनुभवी हरमनप्रित सिंग कर्णधार म्हणून संघाचं नेतृत्व करेल. तर हार्दिक सिंग उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे. भारतीय संघाचा आधारस्तंभ असलेला दिग्गज गोलकीपर पी आर ब्रिजेश आणि मिडफील्डर मनप्रीत सिंग हे त्यांचं चौथं ऑलिम्पिक खेळत आहेत.

<><><><><>

टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत उद्या भारताचा सामना गतविजेत्या इंग्लंडशी होणार आहे. गयाना इथं रात्री ८ वाजता हा सामना सुरु होईल. त्याआधी उद्या सकाळी ६ वाजता  त्रिनिदादमध्ये तारौबा इथं दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे.

<><><><><>

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित, अर्थात स्टेम क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री पश्चिम विभाग आणि इंडियन विमेन नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने स्पार्क या कार्यक्रमाचा प्रारंभ आज मुंबईत करण्यात आला. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या काळात हा कार्यक्रम राबवला जाणार आहे.

महिलांना स्टेममध्ये रस निर्माण करणं, या विषयांशी संबंधित कौशल्यं वाढवणं आणि या क्षेत्रात गती असणाऱ्या महिलांना कामाच्या संधी उपलब्ध करून

देणं यासाठी शाळांमध्ये काम, शिष्यवृत्ती निधी आणि प्लेसमेंट सेल निर्माण करण्याची ही योजना आहे.

<><><><>

सीबीएसई अर्थात  केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षेचं अंतिम वेळापत्रक जाहीर झालं आहे. त्यानुसार ही परीक्षा १५ ते २२ जुलै या कालावधीत होईल. सीबीएसईच्या संकेतस्थळावर  हे वेळापत्रक उपलब्ध आहे.

<><><><>

भारताच्या सीमेवर म्यानमारमधे सुरू असलेली हिंसा आणि त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती याबद्दल भारताला मोठी चिंता वाटत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ  एस जयशंकर यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत  जयशंकर तसंच म्यानमारचे उपप्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री यु थान श्वे यांनी चर्चा केली. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><>

आंतरराष्ट्रीय सौर युतीचा पूर्ण सदस्य म्हणून सहभागी होणारा पॅराग्वे हा १००वा देश ठरला आहे. पॅराग्वेचे राजदूत फ्लेमिंग राऊल दुआर्टे आणि डिपॉझिटरी प्रमुख, संयुक्त सचिव अभिषेक सिंग यांच्यामध्ये आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीदरम्यान पॅराग्वेनं मंजुरी करता दस्तऐवज सादर केले असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं.

<><><><>

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं आज नवी दिल्ली इथं आयोजित समारंभात भारतीय नौदलाला मध्यम पल्ल्याचा मायक्रोवेव्ह ऑब्स्क्युरंट चाफ अग्निबाण सुपूर्द केला.

//<><><><><>//